ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारताचे परराष्ट्रीय धोरणः एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**
*सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख*
*आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,*
*देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली*

**सारांश (Abstract)**
*जागतिकीकरणाच्या प्रक्रियेअंतर्गत आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण झालेले आव्हानांना सामोरे जाणे, शितयुध्दोत्तर काळात विकसित झालेल्या नवीन विश्वरचनेशी राष्ट्रीय हित संबंधाच्या संरक्षणासाठी जुळवून घेणे, आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे वास्तववादी पाहण्याची मानसिकता भारतीय धोरणकर्त्यांमध्ये आकाराला आली. एक विभागिय महासत्ता म्हणून भारत विकास पाहून विकसिशिल राष्ट्रांचे नेतृत्व करणे, यातूनच राजनयाचा आकृतीबंध तयार करणे, भारतीय परराष्ट्रीय धोरणातील सातत्य आणि स्थित्यंतर यांचा बदलता प्रवाहाचा चिकित्सक अभ्यास.*

**Key Words :**
*1) आदर्शवाद 2) राष्ट्रीय सुरक्षा 3) जागतिकीकरण 4) तंत्रज्ञानात वाढ 5) व्यावहारिकता*

**प्रस्तावना :**

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या विकासाचे प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व कालखंड, स्वातंत्र्योत्तर कालखंड आणि शीतयुध्दोत्तर कालखंड असा बदलत्या संदर्भाचा प्रवाह आणि 19 व्या शतकापासूनच परराष्ट्रीय धोरणाच्या विकासासाठी भारतीय परराष्ट्रीय धोरणाची सैध्दांतिक चौकट तपासतांना रविंद्रनाथ टागोर, श्री. अरबिंदो, महात्मा गांधी आणि पंडित नेहरु, लाल बहाद्दूर शास्त्री, श्रीमती इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंहरा, मनमोहन सिंग आणि विद्यमान पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचा परराष्ट्रीय धोरणावर पडलेला प्रभाव.

भारतीय परराष्ट्रीय धोरणाची पायाभूत तत्वे ही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीबरोबरच विकसित होत गेली. भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या विचारांवर देखील ब्रिटीश उदारमतवादी परंपरेचा जबरजस्त प्रभाव होता. जसे भारताने राष्ट्रकुल संघटनेचे स्विकारलेले सदस्यत्व. स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या पंचशील धोरणाचा आधार मानतांना डॉ. एन. व्ही. राजकुमार म्हणाले होते “ These were the earliest expressions of Indias dislike of getting involved in unnecessary foreign entanglements and favoring a neutral stand on matters that did not concern her.”[1] आदर्शवादी दृष्टीकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहण्याची मानसिकता 19 व्या शतकापासूनच विकसित होत गेली. कॉंग्रेसने सेक्रेटरी ऑफ स्टेटला लिहिलेल्या पत्रात स्पष्ट केले की, “We have not the slightest doubt that, as on as previous occasions… the princes and people of India will readily and willingly cooperate to the best of their capability.”[2] पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर आंरराष्ट्रीय घडामोडींमध्ये भारताचा सहभाग वाढला व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली.

**संशोधन पध्दती :**

- प्रस्तुत संशोधनासाठी विषयाची निवड
- संबंधित साहित्याचे सर्वेक्षण
- संशोधन पध्दतीला परिभाषित करणे
- संकल्पनांचे स्पष्टीकरण
- उद्दिष्टांची मांडणी

**गृहितके :**

- स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील परराष्ट्रीय धोरण आदर्शवादी होते.
- परराष्ट्रीय धोरणाला वास्तविक व धोरणात्मक दिशा मिळाली.
- विद्यमान परराष्ट्रीय धोरण व्यावहारिक आहे.

**उद्दिष्ट्ये :**

1. पडित नेहरु यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भूमिका आदर्शवादी होती.
2. श्रीमती इंदिरा गांधींचे धोरण हे वास्तविक व धोरणात्मक होते.
3. 1991 नंतर खुल्या आर्थिक व्यवस्थेचा स्विकार केला व व्यावहारिकता आली.

**डद्दिष्टांचे विश्लेषण :**

1) पडित नेहरु यांच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील भूमिका आदर्शवादी होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीयांच्या विचारांमध्ये संघटीतपणा आणि सुत्रबध्दता आली. आयरिश लोकांच्या स्वातंत्र्य चळवळीसंबंधी सहानूभूती आणि समर्थन दाखविणारा भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचा 1920 चा ठराव. 1921 ला अखिल भारतीय कॉंग्रेस समितीने दिल्ली येथे बैठकीत भारतीय परराष्ट्र धोरणासंबंधी निर्णयात म्हटले की, केवळ शेजारी राष्ट्रांचाच नाहीतर जगातील प्रत्येक राष्ट्रांशी शांततेचे, मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करेल. भारतीयांचा दृष्टीकोण व्यापक होण्यामागचे प्रमुख कारण प्रसिध्द व्हर्सायच्या तहावर भारताने केलेली स्वाक्षरी आणि राष्ट्रसंघाचे स्विकारलेले सदस्यत्व. या आतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना पहिल्या महायुध्दादरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वूड्रोविल्सन यांच्या जगप्रसिध्द ‘‘14 कलमी

योजनेचा'' भाग होती. भारत मूळ सदस्य बनला. त्यानंतर आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (International Labour Organization) आणि आंतरराष्ट्रीय न्यायालय (Permanent Court of International Justice) या संघटनामध्ये आपले प्रतिनिधी पाठविले. सन 1928 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनामध्ये एस स्वतंत्र विभाग स्थापन केला आणि त्याद्वारे सर्व राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतला. 20 व्या शतकाच्या पूर्वार्धापासूनच अनेक आशियायी राष्ट्रांमधून वसाहतवादा विरुध्द आंदोलनांना जसे इजिप्त, सिरिया, इराक, पॅलेस्टाईन मध्ये पश्चिमी वसाहतवाद विरुध्द त्यांना भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने पाठींबा दर्शविला. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही एक वसाहतवादाविरोधी आतरराष्ट्रीय चळवळीचा एक भाग आहे. असे परराष्ट्रीय विभागाचे संचालक पडित जवाहरलाल नेहरु यांनी स्पष्ट केले. जवाहरलाल नेहरुंकडून सन 1927 च्या ब्रुसेल्स येथील निर्णयामुळे वसाहतवाद विरोधी उद्दिष्ट विकसित झाले. दूसऱ्याचं कालखंडात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने परर" ट्र धोरणाच्या संदर्भात जे विविध ठरावमंजूर केले त्यांमधुन भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्यिष्टे निश्चित झाली वसाहतवादाचा विरोध हूकूमशाचिा विरोध आणि उदारमतवादी लोकशाहीचा आदर वंशवादाा विरोध आफ्रो. आशियाई राष्ट्रांना संघटित करून सामूहिक विकास साधणे सर्व रा" ट्रांशी मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध प्रस्थापिक करणें युध्दाचा विरोध करून आंतरराष्ट्रीय प्रश्न शांतता आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडविणे आतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षीतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेला समर्थन याच तत्वांतर्गत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने 1920 मध्ये स्थापना झालेल्या राष्ट्र संघाला आणि 1945 मध्ये स्थापना झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेला पूर्ण समर्थन दिले. यावरुन आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयीच्या भारतीयांच्या आदर्शवादी दृष्टीकोनाचा स्वातंत्र्योत्तर काळातील परराष्ट्र धोरणावरील प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. भारतीय परराष्ट्र धोरणाला आदर्शवादी बनविण्यात महात्मा गांधींचा अहिंसावाद, रविंद्रनाथ टागोर आणि गोपाळकृष्ण गोखल्यांचा उदारमतवादी आंतरराष्ट्रीय वाद आणि नेहरुंच्या लोकशाही समाजवाद आढळतो. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नेहरुंची भूमिका स्पष्ट होती. पी. एन. हकसर म्हणतात. "Neharu fore saw that India's security could be better achived through friendship than through military buildup"[3]

पंडित नेहरुंच्या सन 2012 मध्ये चिनने भारतावर केलेल्या 1962 च्या आक्रमणाला पन्नास वर्ष पूर्ण झाली. प्रसार माध्यमातून नेहरुंवर अनेकांनी टिका केली. अमेरिकेत वास्तव्य करुन असलेले भारतीय वंशाचे एक अभ्यासक आणि लेखक फरिद झकेरिया यांनी आपल्या 'पोस्ट अमेरिकन वर्ल्ड या बहुचर्चिन ग्रंथात नेहरूच्या परराष्ट्र धोरणावर टिका करताना म्हटले आहे की "Nehru rooted India's foreign policy abstract inea's rather than a stragic conception of national interests"[4]

**नेहरूंचा परराष्ट धोरणाची मुख्यतत्वे :**

- स्वायत्त परराष्ट्र धोरण
- अलिप्ततावाद
- तिऱ्या जगाचे ऐक्य

नेहरुंच्या परराष्ट्र धोरणातील नैतिकतेची मूल्ये गोखले आणि बॅनर्जीच्या विचारांनी प्रभावित होती. शांतता, अहिंसा, मानवतावाद, बंधुभाव, शांततापूर्ण सहजीवन, सत्येच्या राजकारणाचा विरोध ही नैतिकतेवर आधारित तत्वे आधुनिक भारतीय राजकीय विचारांनी प्रभावित होती. नेहरुंच्या या आदर्शवादी विचारांचा प्रभाव भारताच्या शीतयुध्दाकालीन परराष्ट्र धोरणावर झाला.

**नेहरुंची चार तत्व :**

1. भारताच्या नैतिक अधिष्ठानाचे महत्म्य.
2. पश्चिम राष्ट्रांच्या वसाहतवादी धोरणाचा निषेध
3. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रांमधून सुरु असलेल्या निर्वसाहतीकरणाच्या चळवळीला समर्थन.
4. संरक्षित संमिश्र अर्थव्यवस्था.

**स्वतंत्र भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचे आदर्श :**

ब्रुसेल्सवरुन परतल्यावर श्री. पंडित नेहरुंनी कॉंग्रेस समोर एक अहवाल प्रस्तुत करुन असा निर्णय घेतला की, ''भारत आशियायी रा" ट्रांना संघटीत करण्यासाठी एक आशियायी संमेलनाचे आयोजन करेल व त्यांनर युरोपियन साम्राज्यवादाच्या विरुध्द आशियायी रा" ट्रांना संघटीत करण्यासाठी भारत निरंतर प्रयत्न करीत राहील''[5] 1919 ते 1939 या कालावधीतील ज्या काही आंतरराष्ट्रीय घडामोडी घडल्या त्यावर राष्ट्रीय कॉंग्रेसने सर्व घडामोडींवर आपले विचार व्यक्त केले होते. डॉ. एन. व्ही. राजकुमार यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या या धोरणाला पंचशील धोरणाचा आधार मानतांना म्हटले की, "These were the earliest expressions of Indians dislike of getting involved in unnecessary foreign entanglement and favoring a neutral stand on matters that did not concern her"[6] ''भारतीय परर" ट्रीय धोरणाची मुळे गेल्या काही शतकामध्ये विकसित समस्यांच्या मुळात दडली आहे आणि यात चिंतणशैली ब्रिटीश धोरणाचा वारसा स्वातंत्र्य आंदोलन आणि परराष्ट्रीय प्रश्नासंबंधी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची झेप, गांधीवादी तत्वज्ञानाचा प्रभाव, अहिंसा आणि साध्य आणि साधनांचे महत्वाचे गांधीवादी सिध्दांत इत्यादिंचा प्रभावी योग्य राहिला आहे''[7]

**भारतीय संविधान आणि परराष्ट्रीय धोरण :**

26 सप्टेंबर 1946 ला पंडित जवाहरलाल नेहरुंनी स्वातंत्र्य संमेलनात बोलतांना भारतीय परराष्ट्रीय

धोरणाची रुपरेषा स्पष्ट करतांना म्हटले की, ''परराष्ट्रीय संबंध क्षेत्रात भारत एका स्वतंत्र धोरणाचे अनुसरण करेल आणि गटांच्या ओढाताणीपासून दूर राहून जगातील सर्व पारतंत्र्यातील राष्ट्रांना आत्मनिर्णयाचा अधिकार देणे व जातीय भेदभाव धोरणाचा दृढनिश्चयतापूर्वक उच्चाटन करण्याचा प्रयत्न करेल. सोबतच भारत जगातील शांततामय राष्ट्रांसोबत राहून आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सद्भावनेच्या प्रसारासाठी सदैव प्रयत्नशील राहील.''[8]

''भारताच्या परराष्ट्रीय धोरणाच्या मूळ बाबींचा समावेश संविधान कलम 51 मध्ये केलेला आहे.''[9]

1. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेमध्ये वृध्दी करणे.
2. सर्व राष्ट्रांसोबत न्यायपूर्ण व सन्मानजनक संबंध कायम राखणे.
3. आंतरराष्ट्रीय कायदा तसेच विभिन्न रा" ट्रांतील परस्परांतील कराराचे आदरपूर्वक पालन करणे.
4. आंतरराष्ट्रीय वादविवाद मध्यस्थितीद्वारे सोडविण्यास प्रोत्साहन देणे.

**भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची निर्धारक तत्वे :**

- प्रो. एम. ब्रेचर म्हणतात, भूगोल बाह्या पर्यावरण, व्यक्तीमत्व, आर्थिक आणि लष्करी तत्व जनमताला सम्मीलित करीत असते. तर या विषयाचे गाढे अभ्यासक डॉ. रोजेनी म्हणतात, ''देशाचा आकार, भूगोल, आर्थिक विकास, इतिहास आणि संस्कृती, राष्ट्रा राष्ट्रांमधील पारस्पारीक संबंध, महासत्तेची संरचना, राजकीय संस्था, अंतर्गत आणि बाह्या स्थिती या सारख्या घटकांना सुचित करते.''[10] या संदर्भात,
- भौगोलिक तत्व
- आर्थिक तत्व
- सैनिक तत्व
- ऐतिहासिक परंपरा
- वैचारिक तत्व
- राष्ट्रीय संघर्ष
- वैयक्तिक आणि राजकीय तत्व
- राष्ट्रीय हित

**भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची प्रमुख वैशिष्ट्य**

- असलग्नतेचे धोरण
- शांततावादि निती
- साम्राज्यवाद वसाहतवाद विरोधी धोरण
- जातीय वर्णभेद विरोधी धोरण
- संयुक्त राष्ट्रसंघाचे समर्थन
- सहअस्तित्वास विश्वास
- साधनांच्या पवित्रतेचा सिध्दांत
- पंचशील सिध्दांत

**पंतप्रधान इंदिरा गांधीच्या परराष्ट्रीय धोरणाची चिकित्सा :**

श्रीमती इंदिरा गांधीनी आपल्या परराष्ट्रीय धोरणाचा आधार राष्ट्रीय हिताची सुरक्षा या घटकावर निर्धारित केले. त्यांनी सर्व वादग्रस्त प्रश्नांबाबत स्वतंत्र दृष्टिकोन स्विकारला ''कोटयावधी भारतीयांची उपासमार आजारपण व निरक्षरता दुर सारण्यासाठी त्यांनी आदर्शवादी धोरणाला बगल देऊन वास्तववादी आधार ठरले. अशाच कार्यांना महत्व दिले त्यांनी सत्तेत पदार्पण करताच त्यांना असा अनुभव आला की भारताची भुमी, भु–राजकीय स्थिती, आकार, लोकसंख्या इत्यादी भारताला एका मोठ्याा राष्ट्रांत रुपांतरीत करु शकते आणि जागतिक राजकारणात भारत एक सशक्त भूमिका पार पाडू शकतो. त्यासाठी त्यांनी अमेरिका,रशिया, चीन, फ्रॉन्स, इंग्लंड या शक्तीशाली राष्ट्रापती व्यावहारिक दृष्टीकोन स्विकारला. आशियायी व आफ्रिकन राष्ट्रांप्रती प्रगतिशील सामाजिक क्रांतींची धारणा या आधारावर निर्णयात्मक परराष्ट्रीय धोरणाला खतपाणी दिले.''[11]

- नविन परिप्रेक्षातून विचार
- असंलग्नातावादाचा यथार्थवादी विचार अर्थात शांततावादाचे प्रेरणास्त्रोत
- अन्यायमुक्त मानवी समाजाची निर्मिती
- शीतयुध्दा ऐवजी सहकाराकडे वाटचाल
- कुटनितीक धोरण आधार.
- दोन महासत्तात संतुलन साधन्याचा प्रयत्न
- शांततेसोबत विकासाला सर्वोच्च स्थान.
- यथार्थवादाकडे वाटचाल

**21 व्या शतकातील Economic Pragmatism चे अध्ययन करणे.**

31 ऑक्टोंबर 1984 ला श्रीमती इंदिरा गांधीच्या हत्येनंतर भारताचे पंतप्रधान राजीव गांधी बनले. ते राजकीय दृष्ट्याा अपरिपक्व होते. सामूहिक राजनयाला खऱ्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला. राजीव गांधींनी राष्ट्रीय हित आणि प्रादेशिक हित यांना एकाच पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला. राजीव गांधीच्या परराष्ट्रीय धोरणामध्ये नेहरुंचा आदर्शवाद व इंदिरा गांधींचा यथार्थवाद यांचा समन्वय आढळतो. दक्षिण आशियायी क्षेत्रात क्षेत्रीय संघटना 'सार्क' यांच्या निर्मितीमागे राजीव गांधीचे योगदान असल्याचे दिसते. राजीव गांधी च्या परराष्ट्रीय धोरणाचा गुणगौरव 'अभिजनवादी राजनय' अशी पावती विकसित राष्ट्रांनीच दिलेली आहे. ''दक्षिण आशियात साम्यवादाच्या वाढत्या प्रभावाचे प्रतिरोधन (containment of communism in South Asia) करणे अमेरिकेला गरजेचे वाटले. अमेरिकेच्या अप्रत्यक्ष आशिर्वादाने 1969 मध्ये दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रांची सहकार्य संघटना अर्थात ''आसियान'' ची स्थापना झाली. भारत आणि अन्य सदस्य देश यांची महत्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटना बरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को – ऑपरेशन डॉयलॉक (ACI) 34, साऊथ एशिया सब रिजनल इकॉनॉमिक को–ऑपरेशन

(SASEC-E) मेकॉग –गंगा को–ऑपरेशन (MGC-E), इंडियन ओशियन रिम असोशिएशन (BBW-4) आणि बंगालच्या उपसागरानजिकच्या देशांची परिषद (BIMSTEC-7) यांचा समावेश यात होतो''[12]
विसावे शतक हा भांडवलशाहीच्या आत्यंतिक विजयाचा काळ ठरतो. इंग्लंड, फ्रॅान्स, जर्मनी ही युरोपीय राष्ट्रे युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि पूर्व आशियातील जपान ही या शतकात अग्रगन्य राष्ट्र ठरले. ''औद्योगिक क्रांतीनंतर रा" ट्रवादाचा उदय, विज्ञानाचा विकास, नवे तंत्रज्ञान परिणामी उत्पादनात वाढ होत गेली. दळणवळणाच्या साधनांमुळे राष्ट्रांचे परस्पर संबंध वृध्दींगत झाले. प्रारंभी इंग्लंड, फ्रॅान्स नंतर सर्व युरोप खंड, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि जपान यांचाही समावेश झाला. होकायंत्रामुळे परस्पर परिचयातून व्यापार वृध्दी झाली. आशियातील जुनी राज्ये भारत, चीन, तुर्की साम्राज्यातील प्रदेश आणि इराण ही या जागतिकीकरणात परिघावरची राष्ट्रे म्हणून सामील झाली.''[13] 1991 सालच्या लोकसभेच्या निवडणूकीनंतर केंद्रामध्ये नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसचे सरकार अस्तित्वात आले आणि देशाच्या स्वातंत्र्यानंतर भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे शिल्पकार पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी पुरस्कृत केलेले व अनेक वर्षे चालू असलेले आर्थिक नियोजनाचे धोरण सोडून त्यांनी नवीन आर्थिक धोरण स्विकारले. 20 व्या शतकातील हे शेवटचे दशक स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वाधिक आव्हानात्मक दशक ठरले. ''सोव्हीएत सोशोलिस्ट रिपब्लिक'' (USSR) या साम्यवादी देशाचे राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी 25 डिसेंबर 1991 ला आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि 26 डिसेंबर 1991 रोजी या देशाचं विघटन झालं. ''एकंदरित राजकीय समिकरणच बदलली आणि जगातील सत्ता संतूलनही ढळल. 1991 मध्येच नरसिंहराव पंतप्रधानपदी असतांनाच मनमोहन सिंग अर्थमंत्री झाले आणि भारताने उघडपणे खुल्या अर्थव्यवस्थेचं व उदारिकरणाचं धोरण स्विकारलं. समाजवादाकडून खाजगीकरणाचा स्विकार करुन आपल्या आर्थिक सुकाणूची दिशा बदलली.''[14]
तत्कालिन पंतप्रधान पदाचे हक्कदार राजीव गांधी यांच्या हत्येमुळे 12 ते 15 जून 1991 या दरम्यान झालेल्या निवडणूकीत कॉंग्रेसचे जे" ठ नेते पी. व्ही. नरसिंहराव हे 21 जून 1991 रोजी भारताचे पंतप्रधान झाले. ''जागतिकीकरणाचे वारे त्या काळात वाहू लागल्याच्या पार्श्वभूमिवर, अर्थमंत्री मनमोहन सिंग यांच्या सहकार्याने त्यांनी तोपर्यंत चालू असलेल्या नेहरु प्रणित समाजवादी आर्थिक धोरणांना पूर्णतः मूरड घालून नवीन आर्थिक धोरण राबविल्याने त्यांची 5 वर्षाची कारकिर्द महत्वाची ठरली आणि ते भारताचे उदारिकरणोच उद्‌गाते ठरले. ''[15] पंतप्रधान नरसिंहराव यांच्या समोर अत्यंत गंभीर राजकीय व आर्थिक आव्हाणे, जसे पंजाबमधील दहशतवादाचा प्रश्न, रामजन्म भूमी– बाबरी मशिदिचा वाद, याहीपेक्षा अत्यंत गंभीर प्रश्न असा की, ''राजकीय आव्हानांपेक्षा आर्थिक आव्हाणे देशाच्या दृष्टीने अधिक गंभीरच नाही तर 'बिकट' होती. कारण चलन वाढीचा दर 17 टक्क्यांवर पोहचलेला होता तर आर्थिक वृध्दिचा दर 1.1 टक्यांनी घटलेला होता. परकीय चलनाच्या गंगाजळीची अवस्था अशी होती की, आयातीसाठी केवळ आठवडाभर पुरेल इतकीच व्यवस्था होती. परकीय कर्जाची परतफेड करणं व त्याचं व्याज देणंही कठीण झालेलं होतं.''[16] ''तत्कालिन काळजीवाहू चंद्रशेखर सरकारणे भारतीय गंगाजवळील 27 टन सोनं घाई गडबडीने स्विस एअरवेजच्या विमानातून आंतरराष्ट्रीय बाजारात विक्रीसाठी पाठवावं लागलं. त्यापाठोपाठ 'बॅलन्स ऑफ पेमेंट' सांभाळण्यासाठी रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया ला 46 टन राखीव सोनं बॅंक ऑफ इंग्लंड व बॅंक ऑफ जपान यांच्याकडे गहाण ठेवून इतर कर्ज फेडींसाठी कर्ज घ्यावं लागलेलं होतं.''[17]

**आत्मनिर्भरतेचे ''सासगी'' स्वप्न :**

आपल्या पूर्वीच्या सरकारने सार्वजनिक क्षेत्रात मोठ्याा प्रमाणात गुंतवणूक केली. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणूकीचं आवाहन केलं आणि सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणूकीचं केंद्र बनलं. उद्‌देश असा की, खासगी क्षेत्रात फारशी गुंतवणूक नव्हती, उद्योजक पुढे येत नव्हते, खासगी भांडवल नव्हतं म्हणून सरकारला अर्थव्यवस्था सांभाळण्यासाठी व्यवस्थेत राहणं आवश्यक होतं.''[18] देशातील मोदी सरकार आर्थिक वर्ष 2021–22 मध्ये सरकारी एअर लाईन कंपनी, एअर इंडिया आणि आईल मार्केटींग कंपनी, भारत पेट्रोलियमचे खासगीकरण करु शकते. याची माहिती सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभागचे सचिव तुहिनकांता पांडे यांनी दिली आहे. 2021–22 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात 1.75 लाख कोटी रुपयांचे निर्गुतवणुकीचे लक्ष ठेवण्यात आले आहे, त्यातील बहुतांश खासगीकरण आणि एलआयसी आयपीओ मधून येण्याची अपेक्षा आहे.

**जागतिकीकरण :**

''जागतिकीकरण हे उदारिकरण आणि खासगीकरण धोरणांचे परिणाम आहे. जागतिकीकरण जागतिक अर्थव्यवस्थेबरोबर देशाची अर्थव्यवस्थेचे एकीकरण समजले जाते. जागतिकीकरण हे परस्परालंबित्व आणि एकात्मतेच्या दिशेने जग बदलण्याच्या उद्‌देशांचा विविध धोरणांचा एकात्मतेच्या दिशेने जग बदलण्याच्या उद्‌देशांचा परिणाम आहे.''[19]

**भारतावर जागतिकीकरणाचा प्रभाव :**

- तंत्रज्ञानात प्रवेश
- आंतराष्ट्रीय व्यापार वाढ
- उत्पादनात वाढ
- रोजगार संधी
- विदेशी भांडवलाचा मुक्त प्रवाह

**जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम :**

- आर्थिक अस्थिरता

- कामगारांवर परिणाम
- शेतकऱ्यांवर परिणाम
- पर्यावरणावर परिणाम
- बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व
- राष्ट्रीय सार्वभौमत्वाला धोका

**निष्कर्ष :**

नेहरुंच्या आदर्शवादात भारतातील लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी स्वातंत्र्य आणि समता साधने, समाजातील विषमता नष्ट करणे. मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून कल्याणकारी राज्याची कल्पना व लोकशाही समाजवादाचे मूळ रुजविण्यात नेहरुंनी पुढाकार घेतला. सन 1939 मधील कराची येथे कॉंग्रेसची बैठक 1936 च्या लखनौ येथे कॉंग्रेसमध्ये लोकशाही समाजवादावर चर्चा होऊन भारतातील गरिबी, बेरोजगारी, मागासलेपणा नष्ट करणे त्यासाठी 1938 मध्ये स्थापन झालेल्या नॅशनल प्लॅनिंग कमीशनमध्ये आर्थिक नियोजनाच्या प्रश्नांवर चर्चा त्या कमीशनचे नेहरु अध्यक्ष होते. स्वतंत्र भारताची प्रतिमा मांडतांना नेहरुंनी भारताला इतर आशियाई राष्ट्रांबरोबर जोडण्याचा प्रयत्न केला. " My Picture of the future is a federation which includes China and India, Barma and Ceylon, Afghanistan and Possibly other countries, If world federation comes, that will be welcome."[20] तिसऱ्या जगातील राष्ट्रांना एकत्रिक करुन त्यांच्या आर्थिक आणि व्यापारी अधिकारांच्या रक्षणासाठी सामूहिक प्रयत्न करणे यावरच पुढे आंतरराष्ट्रीय आर्थिक रचनेची (New International Economic Order) मागणी केली गेली. नेहरुंच्या लोकशाही समाजवादामध्ये वसाहतवाद आणि वंशवादाला विरोध, स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची निर्मिती, आत्मनिर्भरता, स्वयंनिर्णयाचा अधिकार ही उद्दिष्टे समाविष्ठ असलेली दिसतात.

पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी अल्पशा काळातच आदर्शवाद व व्यवहारवाद यांचा सुरख समन्वय साधून पाकिस्तानला त्याच्या आक्रमणाचे सडेतोड उत्तर दिले होते आणि अमेरिकेसारख्या महासत्तेच्या दडपणाखाली न येता व्यवहारवादी धोरणाचा परिचय दिला होता. तसेच ताश्कंद करार करुन आदर्शवादाचाही परिचय दिला होता. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या परराष्ट्रीय धोरणाने जागतिक पातळीवर भारताला प्रतिष्ठेचे स्थान मिळवून दिले. आंतरराष्ट्रीय राजकीय जगतात भारताच्या परराष्ट्रीय धोरणाची छाप स्पष्टपणे दिसत होती. एक सुदृढ भारताचे परराष्ट्रीय धोरण श्रीमती इंदिरा गांधींनी राष्ट्र हितासाठी केलेले होते. पंतप्रधान राजीव गांधींचे परराष्ट्रीय धोरण आधुनिक भारताच्या जडण घडणीत प्रशंसनिय ठरले होते. पंतप्रधान राजीव गांधींनी प्रादेशिक संघटनेचे महत्व ओळखले होते व त्याकरिता सार्क सारख्या प्रादेशिक संघटनांना मजबूत करण्योच आणि यशस्वी करण्याचे प्रयत्न केले होते. विज्ञान, तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे जनकत्व राजीव गांधी यांच्याकडे जाते. राजीव गांधींच्या परराष्ट्रीय धोरणाचा एक पैलू म्हणजे 'सामूहिक राजनयाला' ओळखले जाते.

''अमेरिकेसह प्रत्येक देशाची पाऊले सध्या आत्मनिर्भतेकडेच पडत आहेत. जगभरात विस्तार करण्याचा कंपन्यांचा कलही हळूहळू कमी होतांना दिसतो. जागतिकीकरण, उदारिकरण व आर्थिक सुधारणा हा एकेकाळी भारतासह जगभरातील अनेक देशांनी हाती घेतलेला मंत्र होता. त्याला आता तिन–चार दशके उलटून गेली आहेत मात्र, त्यातील जागतिकीकरणाच्या मंत्राची शक्ती नष्ट होऊ लागली आहे. जागतिकीकरणाच्या उलट प्रक्रियेला गेल्या काही वर्षात विशेषतः कोरोना काळात जास्त वेगाने प्रारंभ झाल्याचे जाणवू लागले आहे.''[21] भारतामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर ''आत्मनिर्भते''चा नारा दिलेला आहे. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांनीही 'अमेरिका इज बॅक' म्हणत त्या दृष्टीने पाऊले टाकण्यास प्रारंभ केला आहे. ब्रोक्टीझटच्या निमित्ताने इंग्लंडने युरोप पासून फारकत घेऊन स्वतःचा स्वतंत्र सुभा उभारण्यास प्रारंभ केला आहे. चीन जरी विस्तारवादी भूमिकेमध्ये असला तरी त्याला जगभरातून होत असलेला विरोध लक्षात घेता आगामी काळामध्ये त्याच्याही विस्तारवादाला खिळ बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावरुन असे लक्षात येते की, रशियाच्या विघटनानंतर नेहरु प्रणित अलिप्त राष्ट्र चळवळ कमजोर होत गेली आणि भारत पूर्णतः अमेरिका–इंग्लंड या प्रगत देशांच्या गटाशी संलग्न होऊन सुपर पॉवर होण्याची स्वप्ने पाहू लागला व परराष्ट्रीय धोरणात आर्थिक घटकाचे महत्व वाढीस लागले हे निदर्शनास येते.

**संदर्भ :**

१. *प्रा. डॉ. शैलेंद्र देवळाणकरः भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे 411030, 26 जानेवारी 2010*
२. *प्रा. डॉ. शैलेंद्र देवळाणकरः भारतीय परराष्ट्र धोरणः सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे 411030, 26 जानेवारी 2010 पेज नं. 17*
३. *पी. एल. हक्सर : नेहरुज व्हिजन ऑफ पीस ॲण्ड सेक्युरिटी इन न्यूक्लिअर एज (न्यु दिल्ली, पॅट्रीअट पब्लिशर्स, 1987)*
४. *संजीव बारुआ : 'इम्पायर ऑफ इ माईंड, (इंडियन एक्सप्रेस, 8 फेब्रुवारी 2012) पृ. क्र.10*
५. *Verma D.N. : "India and Asian Solidarity, 1990-1919" in the journal of the Behar Research Society Vol. XLIX, Part- I-IV, PP. 316-328*
६. *Rajkumar N.V. : The Background of Indaian Foreign Policy, PP 9-15*
७. *Pyarelal: Mahatma Gandhi, Vol. I, PP. 49*

८. *Nehru Jawaharlal: Independence and Atter, P. 218.*
९. *गौतम बजेंद्र प्रतापः भारत की विदेश निती, मयूर पेपर बॉक्स, नौएडा 2004, पृ.क्र.24*
१०. *Rosenau James : The Scientific study of foreign Policy, Chapter-II, New York : The free press, 1969, PP. 116-117*
११. *Trevor Drieberg : Indira Gandhi : A Profile in Courage, Vikas Publishing House Pvt. Ltd. 1973, New Delhi, PP. 18-19*
१२. *K. Subrahmanyam : " Prospects for Security and Stability in South Asia" in Stephen Cohen, The Security of South Asia, PP. 201-213*
१३. *नलिनी पंडित : जागतिकीकरण आणि भारत, पहिली आवृत्ती, डिसेंबर 2001, प्रकाशक, प्रकाश विश्वासराव, लोकवाङ्‌मय गृह, भूपेश गुप्ता भवन 85, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई, 400025*
१४. *सुहास कुलकर्णी : असा घडला भारत, 1947.2012 युनिक फिचर्स, मिलिंद चंपानेरकर, रोहन प्रकाशन, प्रकाशन क्रमांक 240, 2013 पृ.क्र. 592–593*
१५. *सुहास कुलकर्णी : असा घडला भारत, 1947.2012 युनिक फिचर्स, मिलिंद चंपानेरकर, रोहन प्रकाशन, प्रकाशन क्रमांक 240, 2013 पृ.क्र. 596–597*
१६. *सुहास कुलकर्णी : असा घडला भारत, 1947.2012 युनिक फिचर्स, मिलिंद चंपानेरकर, रोहन प्रकाशन, प्रकाशन क्रमांक 240, 2013 पृ.क्र. 596–597*
१७. *नलिनी पंडितः जागतिकीकरण आणि भारत, पहिली आवृत्ती, डिसेंबर 2001, प्रकाशक, प्रकाश विश्वासराव, लोकवाङ्‌मय गृह, भूपेश गुप्ता भवन 85, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई, 400025*
१८. *डी. सुब्बारावः खासगीकरण हा भारताच्या शाश्वत विकासाचा मार्ग : Vishal Badel, महाराष्ट्र टाईम्स, updated: March 25, 2021.*
१९. *IBAN and BAYAN: International conference on Alternatives to Globalisation organized at Tagaytay City, Philippines in November 1998.*
२०. *प्रा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर : भारतीय परराष्ट्र धोरणः सातत्य आणि स्थित्यंतर, प्रकाशन क्रमांक 377, प्रतिमा प्रकाशन, 1362 औदुंबर अपार्टमेंट, सदाशिवपेठ, नवा विष्णू मंदिर चौक, पुणे 411030, 26 जानेवारी 2010 पेज नं. 34*
२१. *प्रा. डॉ. सुभाष उपाते : भारताचे परराष्ट्रीय धोरण, राजीव गांधींच्या कालखंडाचे एक तुलनात्मक अध्ययन, 2013.*